# महाराष्ट्र शासन
# संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
# DIRECTORATE Of MEDICAL EDCUATION & & RESEARCH

Govt. Dental College & Hospital Building, 4th Floor, St. George's Hospital Compound, Near CST, Mumbai - 400 001
Tel. No. +91-22-22620361 -65/22652257/59 Telegram: " MEDUCATNSEARCH"
Fax: +91-22-22652168/22620562 Website :http://www.dmer.org

क्र.संवैशिवसं/अधिपरिचारिका/पदे/नेमणूक/जाहिरात/ई/२००७, दि. २४/९/२००७.

# जाहिरात

## सरळसेवेने 'अधिपरिचारिका' पदासाठी नेमणूक - स्पर्धा परीक्षा

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. एनयुआर-२००६/१४४५/प्र.क्र.१२५/०६/परिउपक्रम, दिनांक १३ सप्टेंबर, २००७ अन्वये संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना सरळसेवेने अधिपरिचारीका पदासाठी नेमणूकीकरीता स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी "सक्षम प्राधिकारी" म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने या संचालनालयाच्या अधिपत्याखाली असलेली शैक्षणिक वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये, शासकीय दंत महाविद्यालये व रुग्णालये, आरोग्य पथके, नागरी स्वास्थ्य केंद्र, वांद्रे, मुंबई इत्यादींमध्ये रिक्त असलेल्या परिचर्या संवर्गातील अधिपरिचारिकांची (वेतनश्रेणी रुपये ५०००-८०००) पदे भरण्यासाठी राज्यस्तरीय स्पर्धात्मक परीक्षा रविवार, दिनांक २५/११/२००७ रोजी घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमून्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवाराची शैक्षणिक अर्हता, पदांचा तपशील, संवैधानिक आरक्षण, शासनाच्या धोरणानुसार अपंगाचे आरक्षण, परीक्षेसाठी आवश्यक असलेला अभ्यासक्रम आणि अर्जाचा नमुना इत्यादींची सविस्तर माहिती, माहिती पुस्तिकेमध्ये नमूद केली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | शैक्षणिक अर्हता | : | उमेदवाराने ३ किंवा ३ १/२ वर्षाचा महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त जनरल नर्सिंग व मिडवाईफरी अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा व महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई येथे नोंदणी झालेली असावी किंवा इंडीयन नर्सिंग कौन्सिल मान्यता प्राप्त ४ वर्षाचा बी. एससी. नर्सिंग पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडे नोंदणी झालेली असावी. |
| २) | वयाची मर्यादा | : | उमेदवाराचे वय ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| ३) | अर्ज व माहिती पुस्तिका मिळण्याचे आणि जमा करण्याचे ठिकाण. | : | सर्व अधिसेविका, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये, महाराष्ट्र राज्य (मुंबई / पुणे / मिरज (सांगली) / कोल्हापूर / सोलापूर / धुळे / नागपूर / अकोला / नांदेड / लातूर / औरंगाबाद / यवतमाळ / अंबाजोगाई) यांचे कार्यालयात मिळतील. |
| ४) | अर्ज व माहिती पुस्तिका मिळण्याचे व अर्ज जमा करण्याचा दिनांक | : | दिनांक २२/१०/२००७ ते १०/११/२००७ पर्यंत. दिनांक १०/११/२००७ नंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. |
| ५) | माहिती पुस्तिका व अर्जाची किंमत | : | खुल्या वर्गातील उमेदवारांकरीता रुपये ४००/- मागासवर्गीय उमेदवारांकरीता रुपये २००/- (सदरची रक्कम **"DMER, Mumbai"** यांच्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे स्वीकारली जाईल) |
| ६) | परीक्षेचा दिनांक | : | रविवार, दिनांक २५ नोव्हेंबर, २००७ |

**(डॉ. डब्ल्यु.बी.तायडे)**
**सक्षम प्राधिकारी व संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**